# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५**
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**


**जाहिरात क्र. १९/२०२२-२३**

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा - ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (तिसरी सुधारणा) विनियम, २०२३ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा - ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ ('मुख्य विनियम'), दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी अधिसूचित केले असून त्यानंतर त्यामध्ये १६.५२ हेक्टर्सचे सुधारित परवाना क्षेत्र दर्शविण्यासाठी दि. ३ फेब्रुवारी, २०१७ आणि दि. २१ सप्टेंबर, २०१८ रोजी सुधारणा करण्यात आली आहे.

भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी दिनांक १ जून, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने, गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लिमिटेडचे (जीईपीएल) परवाना क्षेत्र, त्यामधून ऐरोली गावाच्या सर्व्हे क्र. १४५ (हिस्सा), १४६ (हिस्सा), १४७ (हिस्सा), १४८ (हिस्सा), १४९ (हिस्सा) आणि १५३ (हिस्सा), दिघे गावाच्या सर्व्हे क्र. २०८ (हिस्सा) येथील ८.५७ हेक्टर्सचे क्षेत्र निरधिसूचित केल्यामुळे आणि त्यामध्ये ऐरोली गावाच्या सर्व्हे क्र. १४५ (हिस्सा) येथील ०.०९ हेक्टर्सच्या अतिरिक्त क्षेत्राची भर पडल्यामुळे, १६.५२ हेक्टर्स वरुन ८.०४ हेक्टर्सपर्यंत सुधारित झाले आहे. आयोगाने दिनांक २९ जुलै, २०२२ च्या आदेशान्वये पुरवठ्याच्या सदर क्षेत्रातील बदलास तत्वत: परवानगी दिली आहे.

आयोगाने, त्यानुसार पुरवठ्याच्या क्षेत्रात बदल करण्यासाठी मुख्य विनियमांमध्ये मर्यादित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. सुधारणेचे प्रारुप आयोगाच्या **www.merc.gov.in (https://www.merc.gov.in/ regulation_type/draft-regulations/)** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या प्रारुप सुधारणा विनियमांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या संकेत-स्थळावरील **'E-Public Consultation'** या टॅबद्वारे अपलोड करता येतील (www.merc.gov.in/e-public-consultation).या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

**'E-Public Consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, **मा.सचिव , महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०००05** या पत्त्यावर पाठवावी. **३० मार्च, २०२३** रोजी सायंकाळी ५.०० नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८/०२/२०२३

**माननीय सचिव, मविनिआ**